बोन्साय संदर्भातील नोट -बोन्साय

आपल्या संस्कृतीमध्ये निसर्गाला वेगवेगळया कारणांसाठी ‘गुरु’ मानले आहे.त्यामुळे नैसर्गिकरीत्या जे जे असते, तेच चांगले असे आपण मानतो.ते काही अंशी खरेही आहे. पण काही वेळेला तरतम भावाने मानवनिर्मित गोष्टीची तुलना निसर्गातील गोष्टींबरोबर केली जाते. ते बरोबर आहे का, ते निसर्ग प्रेमी म्हणून तपासून पहावे लागते. त्यासाठी बोन्सायचा परिचय थोडक्यात करून घेऊ.

निसर्गात वाढणाऱ्या मोठ्या वृक्षांची प्रतिकृती सिरमिकच्या छोट्या कुंडीत तयार करणे याला सोप्या भाषेत ‘बोन्साय’ म्हणतात. बोन्साय हा मूळचा जपानी शब्द आहे.बोन म्हणजे उथळ कुंडी, किंवा छोटी कुंडी (शलो पॉट) आणि साय-झाड (ट्री).बोन्सायमध्ये संपूर्ण निसर्गाचे हुबेहूब चित्र अगदी लहान प्रमाणावर उभारून काढले जाते.

बोन्सायबद्दललोकांच्या मनात अजूनही गेरसमज आहेत.बोन्साय तयार करताना त्यांची मुले,फांद्या सारख्या कापल्या जातात.त्यामुळे झाडांचा छळ केला जातो.त्यांची वाढ होऊ दिली जात नाही वगरे .परंतु असे काही नाही.झाडावर जर अत्याचार केला तर त्याला रसरशीत हिरवीगार पाने येणार नाहीत, फुले आणि फळांनी झाडे डवरणार नाहीत.

बोन्साय ही झाडे वाढविण्याची कला आहे. बोन्सायची वर्षानुवर्षे, शतकानुशतके , पिढ्यान पिढ्या जपणूक केली जाते. झाडे बोन्साय पद्धतीने वाढविण्यात चिनी आणि जपानी लोकांचा हेतू चांगलाच आहे.चिनी लोकांनी वनस्पतींचा बारकाईने अभ्यास केला.त्यातूनच निसर्ग व जीवन हे अविभाज्य आहेत हे तत्त्व जोपासले गेले.निसर्ग केवळ घराबाहेरच ठेवून चालणार नाही तर तो घरच्या चार भिंतीत सामावला गेला पाहिजे. या भूमिकेतून बोन्सायचा मोठ्या प्रमाणात प्रसार होत गेला. डोंगर-द-यामध्ये हिंडताना लहान उंचीची पण सुंदर आकार असलेली झाडे काढून आणून अरुंद आकाराच्या छोट्या कुंडीत लावून वाढविली जातात.

पूर्वीचे आयुर्वेदाचार्य दुर्मिळ वनस्पतींचे वृक्ष जंगलातून आणून त्यांचे कुंडीत जतन करीत असत.पण ते बोन्साय नव्हते....बरीच दुर्मिळ झाडे आज नष्ट होत चालली आहेत. त्यांचे बोन्साय बनवून जतन करणे ही सुद्धा काळाची गरज आहे.

-संदर्भ- आदर्श घरबाग, डॉ. माधव नागरे, कॉ न्तेनेटल प्रकाशन, पुणे, पृ. क्र. १२७-१२८

मित्रहो, आपल्याला माहीत आहे, की लेखकाने आपल्या कल्पनेच्या साहाय्याने येथे जे चित्रण केले आहे, त्यात सत्याचा अपलाप होतो आहे. पण अशाप्रकारच्या लेखामध्ये ते मान्य होते.कारण लेखकाला ठसवायचे आहे ते मानवाचे खुजेपण,तशी खुजी वृत्ती .त्यादृष्टीने बोन्सायचा विचार करा.